सदरक्षणाय खलनिग्रहणाय

महाराष्ट्र शासन
पोलीस विभाग
वार्ताहर कक्ष,
पोलीस आयुक्त, यांचे कार्यालय,
डॉ. डी. एन. रोड, मुंबई-४००००१.

दूरध्वनी क्र. २२६२०३३२
Email I.D. – pressroom.mum@mahapolice.gov.in

---

जा.क्र. ६७९/वार्ता.कक्ष/२०२१ दिनांक :-१५/१२/२०२१

# —: प्रेस नोट :—

## आरे पोलीस ठाणे, पोलीस अधिकारी व अंमलदार यांची अभिमानास्पद कामगिरी

उत्तर प्रादेशिक विभाग, मुंबई अंतर्गत परिमंडळ १२ मधील आरे पोलीस ठाण्याचे म.स.पो..नि. शैलेजा कदम, व निर्भया पथकाने दिनांक १६/११/२०२१ रोजी निर्भया पथक प्रमुख सपोनि शैलेजा कदम या दिवसपाळी कर्तव्यावर गस्त करीत असताना, एक लहान ०३ वर्षाची मुलगी रस्त्याने रडतांना मिळून आली आजुबाजूस चौकशी केली असता मुलीचे नातेवाईक मिळुन आले नाहीत. म्हणुन सदर मुलीचे फोटो व्हॉट्सॲपवर पाठवुन आजुबाजूचे परिसरात चौकशी केली. तिचे आईवडील देखील तिचा शोध घेत असल्याचे नागरीकांकडून समजले.

सदरची मुलगी अतिशय लहान असुन तिला बोलता येत नव्हते. अशा परिस्थितीत तिचे पुर्ण नांव व पत्ता सांगता येत नसताना देखील जुजबी माहितीच्या आधारे प्रसंगावधान राखुन ०१ तासाच्या आत सपोनि शैलेजा कदम यांनी कुमारी आराध्या हिस तिचे आईवडीलांचे सुरक्षितरित्या ताब्यात देवुन चांगली कामगिरी केली आहे.

यांनी केलेल्या या प्रशंसनीय व उल्लेखनीय कामगिरीबद्दल आज दि १४/१२/२०२१ रोजी मासीक गुन्हे परिषद बैठकीच्या सर्वप्रथम मा. श्री. हेमंत नगराळे, पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांनी, भरुचा हॉल, नविन पोलीस आयुक्तालय ईमारत येथील सभागृहामध्ये पोलीस अधिकारी व. अंमलदार यांना विशेष पारितोषिक व प्रशस्तीपत्र देऊन गौरव केलेला आहे. सदर वेळी मा. विश्वास नांगरे पाटील, पोलीस सह आयुक्त (का. व सु.), मा. श्री. राजवर्धन, पोलीस सह आयुक्त, (वाहतुक) व मा. श्री. मिलिंद भारंबे पोलीस सह आयुक्त (गुन्हे), मा. श्री. राजकुमार व्हटकर पोलीस सह आयुक्त (प्रशासन) यांचे उपस्थितीत सोहळा पार पडला.

(चैतन्या एस्.)
पोलीस उप आयुक्त (अभियान),
जनसंपर्क अधिकारी,
पोलीस आयुक्त कार्यालय, मंबई

Scanned with CamScanner